# मा. उप मुख्यमंत्री (वित्त) श्री. देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवार, दिनांक ९ मार्च २०२३ रोजी केलेल्या अर्थसंकल्पीय भाषणाची ठळक वैशिष्ट्ये

## भाग–दोन

**(अ) राज्यकर विभागाची अभय योजना :—**

- अभय योजनेचे नाव ' महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत अधिनियम, २०२३ ' असे असेल.
- या अभय योजनेचा कालावधी दिनांक १ मे, २०२३ ते दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२३ असा असेल.
- ज्या व्यापाऱ्यांची प्रति वैधानिक आदेशानुसार कोणत्याही वर्षासाठीची असणारी रुपये २ लाखापर्यंत थकबाकीची रक्कम पूर्णपणे माफ. यामुळे लघु उद्योगांना जवळपास १ लाखापेक्षा जास्त प्रकरणांत निश्चितपणे लाभ होईल.
- ज्या व्यापाऱ्यांची प्रति वैधानिक आदेशानुसार थकबाकीची रक्कम रुपये ५० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यापाऱ्यांनी एकूण थकबाकीच्या २० टक्के रक्कम भरल्यास उर्वरित ८० टक्के रकमेस माफी. यामुळे लहान व मध्यम व्यापाऱ्यांना अंदाजे ८० हजार प्रकरणांत निश्चितपणे लाभ होईल.

(ब) रुपये २५,०००/- पर्यंत मासिक वेतन असणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांना व्यवसाय करातून सूट.

(क) व्यवसाय कर अधिनियमामध्ये ' दिव्यांग व्यक्तीची ' दिलेली व्याख्या दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ नुसार सुधारित करण्याचे प्रस्तावित, या सुधारणेमुळे व्यवसायकर सुटीसाठी पात्र ठरणाऱ्या दिव्यांग व्यक्तींच्या संख्येत वाढ.

(ड) मुंबई, पुणे व रायगड येथे विमान चालन चक्की इंधनावरील (ATF) दर २५ टक्के वरुन १८ टक्के करणार.

* * * * *